**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (म.राज्य) ,पुणे
दूसरा व तिसरा मजला,नवीन प्रशासकीय इमारत , विधान भवन समोर ,कॅम्प,पुणे १
**दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०००६ Email ID :**dlrmah.mah@nic.in **Web site :** https://mahabhumi.gov.in

क्रं. रा.भू.४/जमीन सारा/पूर्णांक कार्यपध्दती/२०२३ पुणे, दिनांक :- /०३/२०२३

प्रति,
विभागीय आयुक्त (सर्व)

विषय:- ई-चावडी प्रणालीत मागणी निश्चिती करते वेळी जमीन महसूल (सारा/ऐन) पूर्णांकात करणेची कार्यपद्धती निश्चित करणे बाबत.

संदर्भ:- इकडील कार्यालयाचे पत्र क्र.रा.का.आ.अ.भू.४/गा.न.नं.१ ते २१ अद्यावतीकरण/२०२२, पुणे, दिनांक: १२/०८/२०२२

महोदय,

संदर्भीय पत्र क्रमांक अन्वये ई-चावडी पूर्वतयारीच्या सर्वसमावेशक सूचना देऊन संदर्भीय पत्रात नमूद केलेप्रमाणे अष्टसूत्री कामकाज पूर्ण असणाऱ्या गावांसाठी ई-चावडी प्रकल्प कार्यान्वित करणेकरिता आवश्यक अकाउंट व लॉगीन क्रेडेन्शियल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. राज्यातील ४४,५१२ गावांपैकी २३,९११ इतक्या गावात सध्या ई-चावडीच्या प्रथम भागाचे कामकाज सुरु आहे.

ई-चावडी प्रणाली मध्ये (भाग-१मध्ये) लॉगीन देण्यात आलेल्या गावांची मागणी निश्चित करते वेळी अनेक विभागातून जमीन महसूल पूर्णांकात नसल्यामुळे खातेदारांची एकूण मागणी रक्कम अपूर्णांकात (पैशात) येत आहे. अशा अडचणी येत आहेत व त्यामुळे ८ब आणि ८क मधील खातेदारांच्या रक्कमा किंवा लेखाशिर्षक निहाय बेरजांचा मेळ बसत नाही, असे कळविण्यात आले आहे. वसुली करते वेळी खातेदाराकडील एकूण मागणी रक्कम अपूर्णांकात येत आहे. त्यामुळे खातेदार कडून वसुली रक्कम अचूक न घेता जादा किंवा कमी घ्यावी लागत आहे. तसेच चलन तयार करते वेळी लेखाशिर्षानिहाय एकूण बेरजांमधील तफावती समस्या निर्माण करत आहे. अशा बाबी निर्देशनास आल्या आहेत.

याबाबत विविध विभागात जमीन महसूलाची मागणी निश्चिती करतांना आकारणी पूर्णांकात करण्यासाठी अंमलात असणारी पध्दत वेगवेगळी असल्याचे निदर्शनास आले. तथापि संपूर्ण महाराष्ट्रभरात हिशोब पद्धतीत एकसूत्रता आणण्यासाठी एकच कार्यपद्धती निश्चित करणे आवश्यक आहे. ई-चावडी प्रणालीत मागणी निश्चिती करते

वेळी जमीन महसूल (सारा/ऐन) पूर्णांकात करणे करीता च्या कार्यपद्धती बाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहे.

१. ई-चावडी प्रणालीमध्ये मागणी निश्चिती करते वेळी आकारणीनुसार येणारा मूळ जमीन महसूल (सारा/ऐन) पूर्णांकात करण्यात येईल. (बिनशेती महसूल देखील) तथापी, वजासूट निश्चितीसाठी मात्र खातेदाराच्या लागू मूळ महसुलाच्या रकमेचा विचार करणेत येईल.

२. १ ऑगस्ट २०२३ रोजीच्या मागणी निश्चिती वेळी संपूर्ण महाराष्ट्रात एकसूत्रता आणण्यासाठी ई-चावडी प्रणालीत मागणी निश्चिती करते वेळी वरील मुद्दा क्रमांक १ प्रमाणे कार्यवाही करणेची कार्यवाही ई- चावडी प्रणालीत असेल.

३. तथापि सदर सूचना निर्गमित होण्यापूर्वी अनेक गावातील जमीन महसूल मागणी निश्चिती केली असल्याने १ ऑगस्ट २०२२ रोजी निश्चित केलेली जमीन महसूलची मागणी वसुली सध्या सुरु असलेल्या पद्धतीने करावी व मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केलेनुसार १ ऑगस्ट २०२३ रोजीच्या मागणी निश्चिती वेळी हिशोबात योग्य ते बदल करणेत यावेत.

Signed by Niranjan K
Sudhansu
Date: 19-03-2023 15:55:31
Reason: Approved

(नि. कु. सुधांशु)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य), पुणे

प्रत- जिल्हाधिकारी (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
प्रत- श्री.जितेंद्र जोशी, (ई-चावडी) व्यवस्थापक, प्रोबिटी सॉफ्टवेअर प्रा. लि., पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.

२/- सदर वरील पत्रात नमूद प्रमाणे जमीन महसुलाची मागणी पूर्णांकात करण्यात यावी.